राज्य वेतन सुधारणा समिती,२०१७ च्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी.. नियत / एकत्रित वेतनावर असलेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वेतन दरात सुधारणा करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : वेपुर-२०१९/प्र.क्र.६/ सेवा-९,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०१ मार्च, २०१९

**वाचा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. संकीर्ण-१२१०/ प्र.क्र.३६/ सेवा-९, दि.१० सप्टेंबर, २०१८**
**२) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक : वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दि.०१ जानेवारी, २०१९**

**प्रस्तावना :-**

वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.०१.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या शिफारशीनुसार अंशकालीन पदावर काम करणारे आणि नियत / एकत्रित वेतन घेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियत / एकत्रित वेतन दरात विहित अटींच्या अधीन राहून सुधारणा करण्याची शिफारस स्वीकारण्यात आली आहे. त्यानुषंगाने या कर्मचाऱ्यांच्या नियत / एकत्रित वेतनाच्या दरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासन आता असे आदेश देत आहे की, नियत / एकत्रित वेतनावर असलेल्या अंशकालीन पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सध्या मिळत असलेले नियत / एकत्रित वेतन अडीच पट करण्यात यावे. ही वाढीव रक्कम किमान रू.१५००/- व कमाल रू.३५००/- च्या मर्यादेत राहील.

२. संदर्भाधीन अनु.क्र.१ येथील शासन निर्णयात नमूद अंशकालीन कर्मचाऱ्यांना वरीलप्रमाणे सुधारित वेतनाचा लाभ दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीतील नियत/एकत्रित वेतनाची थकबाकी अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी.

३. संबंधित अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वित्तलब्धीच्या सुधारित दरामुळे होणारा खर्च, त्यांचे नियत / एकत्रित वेतन या संबंधीचा खर्च ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या संबंधित विभागाच्या अनुदानातून भागवावा. अनुदान प्राप्त संस्था व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख

लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची घालण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०३०११६५६२३४१०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.03.01 17:03:31 +05'30'

(भा.ज.गाडेकर)
उप सचिव, वित्त विभाग

**प्रति,**

- राज्यपालांचे सचिव
- मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
- अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
- सभापती / उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
- सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता
- सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
- मंत्रालयीन सर्व विभाग
- मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
- प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
- प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
- प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
- आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
- सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
- प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
- सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
- सर्व विभागीय आयुक्त
- सर्व जिल्हाधिकारी
- सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
- महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई

- महालेखापाल-१ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
- महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
- महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
- सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
- संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
- मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
- उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
- निवासी लेखा परीक्षक, मुंबई
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
- लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
- मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
- बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
- भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी .ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
- भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस.व्ही.पटेल रोड,मुंबई-४
- भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
- इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
- नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट,मुंबई-२१
- शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
- वित्त विभागातील सर्व कार्यासने /निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)